# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.04.2024** **वारःशुक्रवार**

---

1. कर्करुग्णांसाठीच्या पहिल्या स्वदेशी जनुकीय उपचारप्रणालीचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते मुंबईत उद्घाटन,
2. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी राज्यात 352 उमेदवारांचे 477 अर्ज दाखल; आज होणार छाननी,
3. अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र वैध असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा आणि
4. नांदेड आणि अंबरनाथमध्ये झालेल्या दुर्घटनांमध्ये 6 मजुरांचा मृत्यू.

**कर्करुग्ण उपचार**

कर्करुग्णांसाठीच्या, CAR-T (कार-टी) सेल या; देशातील पहिल्या स्वदेशी जनुकीय उपचार प्रणालीचं उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल मुंबईत झालं. आयआयटी मुंबई, टाटा मेमोरियल केंद्र आणि इम्युनोॲक्ट यांनी संयुक्तपणे ही उपचार प्रणाली विकसित केली आहे. या उपचार पद्धतीमुळे सर्व मानव जातीसाठी आशेचा एक नवा किरण निर्माण झाला आहे; याद्वारे असंख्य रुग्णांना नवजीवन मिळू शकेल, असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यपाल रमेश बैस, आयआयटी, मुंबईचे संचालक शुभाशिष गुप्ता यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**उमेदवारी अर्ज -धाराशिव/यवतमाळ/हिंगोली/अकोला/परभणी/बुलडाणा**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा काल अखेरचा दिवस होता. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या 8 लोकसभा मतदारसंघात 26 एप्रिल रोजी मतदान होणार आहे. यासाठी कालअखेर एकंदर 352 उमेदवारांनी 477 अर्ज दाखल केले आहेत. बुलडाण्यात 42, अकोल्यात 40, अमरावतीमध्ये 73, वर्ध्यात 38, यवतमाळ-वाशिममध्ये 49, हिंगोलीमध्ये 78, नांदेडमध्ये 92 आणि परभणीमध्ये 65 उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी काल विविध पक्षातील उमेदवारांनी, पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत, आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

**यवतमाळ वाशिम** मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार राजश्री पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. हिंगोलीत शिवसेनेकडून बाबुराव कदम कोहळीकर यांनी काल अर्ज भरला. त्यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभेला संबोधित केलं. यापूर्वी हिंगोलीमधून शिवसेनेनं खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून नागेश पाटील-अष्टीकर रिंगणात आहेत.

**अमरावती**मध्ये भाजपाकडून खासदार नवनीत राणा यांनी काल अर्ज भरला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करत त्यांनी आपला अर्ज दाखल केला. इथे काँग्रेसकडून बळवंत वानखेडे आणि बच्चू कडू यांच्या पक्षाकडून दिनेश बूब रिंगणात आहेत.

दरम्यान, खासदार नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलं आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं पुरेशा कागदपत्रांची तपासणी करुन त्यांचं जात प्रमाणपत्र वैध ठरवलं आहे. त्यामुळं त्यात कोणाच्याही हस्तक्षेपाची गरज नसल्याचं स्पष्ट मत न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि संजय करोल यांच्या पीठानं नोंदवलं आहे.

**नांदेड** इथं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री भागवत कराड, खासदार अशोक चव्हाण, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत महायुतीचे उमेदवार भाजपाचे प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी **अकोला** इथं आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी विविध समाजाचे नेते उपस्थित होते.

**परभणी**मध्ये वंचित बहुजन आघाडीकडून ऐनवेळी उमेदवार बदलत पंजाब डख यांना उमेदवारी देऊन अर्ज दाखल करण्यात आला. तर बहुजन समाज पार्टीकडून आलमगीर खान यांनी अर्ज भरला.

**बुलडाण्यातून** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नरेंद्र खेडेकर यांनी काल अर्ज भरला. यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने जाहीर सभा घेण्यात आली. युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे, आमदार रोहित पवार यांच्यासह अन्य नेते यावेळी उपस्थित होते. दरम्यान शिवसेनेनं प्रतापराव जाधव यांना या मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्जाची छाननी आज होणार असून 8 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत.

**उमेदवारी घोषणा- मुंबई**

धारशिव लोकसभा मतदारसंघासाठी अर्चना पाटील यांची उमेदवारी काल राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी मुंबईत झालेल्या वार्ताहर परिषदेत जाहीर केली. तत्पूर्वी अर्चना पाटील यांनी पक्षात प्रवेश केला. अर्चना पाटील या भाजपा आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्या पत्नी आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं काल 2 उमेदवार जाहीर केले. भिवंडीतून सुरेश म्हात्रे आणि बीडमधून बजरंग सोनवणे यांना पक्षानं उमेदवारी दिली आहे.

**जाहीरनामा**

भारतीय जनता पार्टीच्या निवडणूक जाहीरनामा समितीची बैठक काल नवी दिल्लीत ज्येष्ठ नेत राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली झाली. काँग्रेसचा जाहीरनामा अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आज जाहीर करणार आहेत. तर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं लोकसभा निवडणुकीसाठी नवी दिल्लीत आपला जाहीरनामा जाहीर केला. पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी, प्रकाश करात, वृंदा करात यावेळी उपस्थित होते.

**निवडणूक तयारी-चंद्रपूर**

राज्यात सर्वत्र लोकसभा निवडणुकांची तयारी सुरु आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहेत. चंद्रपूर लोकसभा मतदारसंघामध्ये काल मतदान केंद्रांची संख्या, नियंत्रण केंद्र, मतदान यंत्रांची संख्या याबाबतचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, निवडणूक निरीक्षक, आणि राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

धुळ्यामध्ये राजकीय पक्षाच्या उमेदवारांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना प्रचार विषयक विविध परवानगी मिळवणं सोयीचं व्हावं यासाठी एक खिडकी योजना कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**<u>जनजागृती-कोल्हापूर</u>**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृतीपर उपक्रमही राबवण्यात येत आहेत. कोल्हापूरमध्ये शाळेतील विद्यार्थी आपल्या पालकांना पत्र लिहून मतदानाचं आवाहन करणार आहेत. याबरोबरच प्रभात फेरीचं आयोजनही करण्यात आलं असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस यांनी दिली.

**<u>जनजागृती-पालघर</u>**

पालघरमध्येदेखील मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले असल्याचं उपजिल्हाधिकारी विजया जाधव यांनी सांगितलं. त्या म्हणाल्या.....

**<u>मृत्यू-नांदेड</u>**

नांदेडमध्ये मलवाहिनी चेंबर दुरुस्तीचं काम करत असताना 2 मजुरांचा चेंबरमध्ये गुदमरून मृत्यू झाला. या मजुरांना वाचवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीचाही मृत्यू झाला आहे. तर ठाणे जिल्ह्यात अंबरनाथ इथं जांभुळ गावात काल पाण्याची टाकी स्वच्छ करताना विजेचा धक्का लागून तीन मजुरांचा जागीच मृत्यू झाला. पंपिंग यंत्रातून वीज पाण्यात शिरल्यामुळे ही दुर्घटना झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<u>निधन</u>**

ख्यातनाम गायक, संगीतकार दिवंगत पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या पत्नी आणि प्रसिद्ध गायक पंडित शौनक अभिषेकी यांच्या मातोश्री विद्याताई अभिषेकी यांचं काल पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 83 वर्षांच्या होत्या. अभिषेकी बुवांच्या संगीतकार्याला आपलं आयुष्य त्यांनी समर्पित केलं होतं. अभिषेकी बुवांच्या सर्वच शिष्यांच्या जडणघडणीत विद्याताईंचा मोठा वाटा होता.

**<u>सोलापूर-तापमान</u>**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात तापमानाचा पारा सातत्याने वाढतच चालला आहे. काल सोलापूरमध्ये पारा 42 पूर्णांक 4 अंशावर पोहोचला होता. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी, असं आवाहन आरोग्य तज्ज्ञांनी केलं आहे. विनाकारण घराच्या बाहेर पडू नये आणि विशेषतः लहान मुलं आणि वयोवृद्ध लोकांची जास्त काळजी घ्यावी, असं आवाहन आरोग्य विभागाने केलं आहे.

**<u>हवामान</u>**

विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात काल सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली असून येत्या 24 तासात या भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी, कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली आहे. आज मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.